| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ७५ वा | शुक्रवार, दिनांक ०५ जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## रिझर्व्ह बँकेचा अंदाज- या वर्षी महागाई वाढेल

## रेपो दर कायम, कर्ज महाग होणार नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था: रिझर्व्ह बँकेने नवीन आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या बैठकीत रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही. तो ५.२५% वर कायम ठेवला आहे. यामुळे कर्ज महाग होणार नाही आणि एचरव वाढणार नाही. तर २०२७ मध्ये महागाईचा अंदाज ४.६% वरून वाढवून ५.१% केला आहे. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज ५ जून रोजी ही माहिती दिली.**




### आरबीआय एमपीसी बैठकीतील इतर मोठे निर्णय

**वाढीचा अंदाज घटवला:** पश्चिम आशियामध्ये (मध्य पूर्व) सुरू असलेला तणाव आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे आरबीआयने आर्थिक विकास दर म्हणजेच जीडीपी वाढीचा अंदाज कमी केला आहे. आता चालू आर्थिक वर्ष-२७ साठी जीडीपी वाढीचा अंदाज ६.९% वरून ६.६% पर्यंत कमी करण्यात आला आहे.

**धोरण 'तटस्थ' ठेवले:** महागाईच्या वाढत्या जोखमी असूनही, चलनविषयक धोरण समितीने आपले धोरण 'न्यूट्रल' (तटस्थ) ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. समिती परिस्थितीवर लक्ष ठेवून डेटाच्या आधारे पुढील पाऊल उचलेल.

**महागाईबाबत चिंता:** गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, किरकोळ महागाई सध्या लक्ष्याच्या कक्षेत असली तरी, जागतिक तणावामुळे इंधन (फ्यूल) आणि ऊर्जेच्या वाढत्या किमती भविष्यात किरकोळ बाजारपेठेवर आणि सामान्य जनतेच्या खिशावर दबाव आणू शकतात.

**कमजोर मान्सूनची भीती:** पश्चिम-दक्षिण मान्सूनमध्ये घट (कमी पाऊस) होण्याच्या अंदाजामुळेही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. याचा थेट परिणाम शेती-शेतकऱ्यांच्या उत्पादनावर आणि ग्रामीण भागातील मागणीवर होऊ शकतो. तथापि, सरकारची पीक विविधीकरण म्हणजेच डायव्हर्सिफिकेशन सारख्या योजना याचा परिणाम कमी करण्यास मदत करतील.

**सेवा क्षेत्र मजबूत:** चांगली गोष्ट अशी आहे की, देशांतर्गत आर्थिक क्रियाकलाप अजूनही मजबूत आहेत. उत्पादन आणि सेवा क्षेत्राची कामगिरी चांगली आहे आणि जीएसटी रेशनलायझेशन व स्थिर रोजगारांमुळे शहरी भागातील उपभोग **(खप)** वाढण्यास मदत मिळत आहे.

### दर दोन महिन्यांनी होते RBI चे मीटिंग

मॉनेटरी पॉलिसी कमिटीमध्ये ६ सदस्य असतात. यापैकी ३ ठइख चे असतात, तर उर्वरित केंद्र सरकारद्वारे नियुक्त केले जातात. ठइख चे मीटिंग दर दोन महिन्यांनी होते. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मॉनेटरी पॉलिसी कमिटीच्या एकूण ६ बैठका होतील. पहिली बैठक ६-८ एप्रिल २०२६ रोजी झाली होती.

## मोघा नदी पात्राच्या रुंदीकरण आणि खोलीकरणाचे काम प्रगतीपथावर: - बाबासाहेब पाटील यांच्या कडून आढावा



**अहमदपूर/प्रतिनिधी:** अंधोरी ता. अहमदपूर जिल्हा परिषद गटाअंतर्गत येणाऱ्या मोघा येथे गेल्या काही दिवसांपूर्वी साठवण तलावाच्या सांडव्यातून आलेले पाणी आणि नदीचे पाणी पात्राबाहेर पडल्याने परिसरातील शेतांमध्ये घुसले होते. यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व शेतीचे अतोनात नुकसान झाले होते. या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी युद्धपातळीवर पावले उचलली असून, सध्या मोघा येथील नदी पात्राचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.

या सर्व कामाची पाहणी राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केली. यावेळी सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान आणि भविष्यातील धोका लक्षात घेऊन माजी मंत्री बाळासाहेबजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनातून आपल्या विशेष प्रयत्नातून आणि अविनाश जाधव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या कामाला मंजुरी मिळून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. नदी पात्राच्या कामाचा दर्जा उत्तम राहावा आणि भविष्यात पुन्हा अशी पूरस्थिती निर्माण होऊ नये, असेही ना. पाटील म्हणाले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य प्रफुलचंद्र गुंडरे, माजी सभापती शिवाजीराव खांडेकर, महेश देवणे, विलास चामे तसेच मोघा ग्रामस्थ उपस्थित होते.

## ५ गुन्हे दाखल, ५० हजार दंड वसूल

### अनधिकृत बॅनर लावणाऱ्यांवर महानगरपालिकेची कार्यवाही

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सर्व प्रिंटर्स यांची बैठक घेऊन सर्वांना विनापरवानगी लावणार नाहीत अशा सूचना देवून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे बाबत आदेशीत करण्यात आलेले होते. तरी मागील दोन दिवसामध्ये लातूर शहरातील अनाधिकृत बॅनरवर कारवाई करणेची सर्व झोन मार्फत विशेष मोहिम घेऊन अनधिकृत बॅनरवर ०५ गुन्हे नोंदविण्यात आलेले असून अनधिकृत बॅनर लावणा-यांवर ५० हजार रु दंडाची आकारणी करण्यात आलेली आहे.

लातूर शहरातील सर्व नागरीकांना, सर्व संघटना व राजकीय पक्ष यांना आवाहन करण्यात येते की महानगरपालिकेने निश्चित करुन दिलेल्या जागेशिवाय इतर सार्वजनिक जागेवर व महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय कोणत्याही ठिकाणी पोस्टोर्स/बॅनर्स/होर्डींग्ज/कमानी लावु नयेत याचे उल्लंघन केल्यास प्रस्तुत कायदेचे अंतर्गत दंडनीय कार्यवाही करुन संबंधितांविरुध्दं पोलिस कार्यवाही करण्यात येणार आहे. तेंव्हा महानगरपालिकेची रीतसर परवानगी घेवुनच पोस्टर्स/ बॅनर्स /होर्डींग्जं/ कमानी लावावेत परवानगी घेतल्यानंतर सदरील जाहिरातीवर महानगरपालिकेचा जाहिरात क्रं. व दिलेला कालावधी दर्शविण्यात यावा असे शहरातील प्रिंटर्स यांची बैठक घेऊन कळविण्यात आलेले आहे. नागरिकांना कळविण्यात येते की, आपण शहरामध्ये वेगवेगळया कार्यक्रमा निमीत्तं लावावयाची पोस्टेर्स /बॅनर्स/होर्डींग्ज/कमानी उभारण्यापुर्वी रितसर संबंधित क्षेत्रिय कार्यालयातून मनपाची परवानगी घेवुनच उभारावेत.

अनाधिकृत पोस्टर्स /बॅनर/होर्डींग्ज/कमानी लावण्यात येणार नाहीत व मा. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेवुन महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## अहमदपुरात मटकावर छापे, तर औंढा नागनाथ येथे वाळू घाटावर कारवाई

### १ कोटी २५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**लातूर/प्रतिनिधी :** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर व हिंगोली जिल्हयात पोलीस पथकाची रवानगी केली होती. सदर पथकाने, दिनांक ०३/०६/२०२६ रोजी, लातूर जिल्हयातील अहमदपुरात भाजी मार्केट परिसरातील भारत फ्रुट कंपनीच्या बाजूस असणाऱ्या मटका बुकीवर कारवाई करत, १७,८९०/- रुपयांची रोकड व १४ हजार रुपयांचे (०२) मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (३) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द अहमदपुर पोलीस ठाणे येथे गुरनं ३७५/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे, अहमदपुर मधील बसस्थानकाचे बाजूस असणाऱ्या शेडमध्ये, तितली भवरा नावाचा जुगार चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, १३,८१०/- रुपयांची रोकड व १८ हजार रुपयांचे (०२) मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (४) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द अहमदपुर पोलीस ठाणे येथे गुरनं ३७६/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या दरम्यान, पोलीस पथकास हिंगोली जिल्हयातील पोलीस ठाणे औंढा नागनाथ हद्दीत अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळाल्याने, पथकाने पोलीस ठाणे औंढा नागनाथ भागातील मौजे चिमेगांव शिवारातील पुर्णा नदीचे वाळू घाटावर कारवाई करत (३) हायवा, (२) गउइ मशीन, एक ट्रॅक्टर यासह नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (१०) ब्रास वाळू, असा एकूण ०१ कोटी २५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात पोलीस ठाणे औंढा नागनाथ गुरनं ४०८/२०२६ कलम ३०३ (२), ६२, ३(५) बी.एन.एस., कलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, कलम ४, २१ खाण व खनिज (नियमन व विकास) अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस ठाणे औंढा नागनाथ येथील पोउपनि अमोल इंगोले हे प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.



उपरोक्त तिनही कारवायांत, पोलीस पथकाने १,२५,९३,७००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपीतांविरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हे नोंद केले आहेत. सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

## प्रभात किरणे

सर्व घडावे मनासारखे
सर्वांनी वागावे मनासारखे
हवे ते मिळावे मनासारखे
कष्टविना,मृग जळासारखे
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**'योग ' ही मानवाला मिळालेली अलौकिक देणगी - पंतप्रधान**

## लातूर रोड टी-पॉईंटवर आणखी एक बळी

**चाकूर/प्रतिनिधी:** लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील लातूर रोड बायपास टी-पॉईंट परिसरात अपघातांचे सत्र थांबण्याची चिन्हे दिसत नसून मंगळवारी झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राष्ट्रीय महामार्गाच्या नियोजनातील त्रुटींवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मृत व्यक्तीचे नाव पंडित नामदेव पवार (वय ५७, रा. शंकरनगर तांडा, वडवळ) असे आहे. पवार हे मोटारसायकलवरून आपल्या गावाकडे जात असताना लातूर रोड बायपास टी-पॉईंटजवळ उड्डाणपुलावरून भरधाव वेगाने येणाऱ्या एका ऑटोने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

स्थानिकांच्या मते, लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील हा टी-पॉईंट परिसर अपघातप्रवण ठरत आहे. लातूर रोड येथील सुमारे दीड किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल टी-पॉईंटवर संपत असल्याने घरणी आणि परिसरातील नागरिकांना महामार्ग ओलांडताना मोठा धोका पत्करावा लागतो. उड्डाणपुलाच्या उतारामुळे वाहनांचा वेग अधिक असतो आणि तो नेमका ओळखणे कठीण जात असल्याने वारंवार अपघात घडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्थानिकांनी या ठिकाणी सर्व्हिस रोड, उड्डाणपुलाची वाढीव लांबी किंवा अन्य सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी अनेकदा केली आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

याच ठिकाणी यापूर्वी घरणीचे उपसरपंच शिवाजी बैनगीरे यांचाही गंभीर अपघात झाला होता. दोन वाहनांच्या मध्ये सापडल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली होती. या अपघातात त्यांचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले असून त्यांना दीर्घकाळ उपचार घ्यावे लागले. तसेच अनेक शेतकरी आणि वाहनचालकांनाही हा मार्ग जीव धोक्यात घालून ओलांडावा लागत असल्याची तक्रार आहे.

लातूर रोड टी-पॉईंट हा दिवसेंदिवस तालुक्यातील धोकादायक अपघातस्थळ म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. पुरेशा सुरक्षा उपाययोजनांचा अभाव, वेग नियंत्रणासाठी प्रभावी यंत्रणेचा अभाव आणि अपूर्ण पायाभूत नियोजन यामुळे येथे अपघातांची मालिका सुरू असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

## दुचाकी लावण्यावरून काठीने मारहाण

**उदगीर/प्रतिनिधी :** शहरातील एका बारसमोर दुचाकी लावण्याच्या कारणावरून आरोपींनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ केली. तर काठीने डोक्यात मारून जखमी केले. याप्रकरणी उदगीर शहर पोलिसात दोघांविरुद्ध गुन्हा झाला आहे.

याबाबत फिर्यादी आझरोद्दीन आझमोद्दीन वाडीवाले (रा. दावणगाव ता. उदगीर) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, बुधवारी (दि. ३) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास शहरातील एका बारसमोर फिर्यादीची दुचाकी लावण्याच्या कारणावरून दोघा. आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण केली.

आरोपी फारुख शेख याने काठीने फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केले. तर आरोपीच्या मुलाने फिर्यादीच्या डाव्या खांद्यावर काठीने मारहाण करून तू जर आमच्या नादाला लागलास तर तुला खतम करुन टाकतो म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली आहे, अशी तक्रार दाखल केली आहे. त्यावरून दोघांविरुद्ध गुरनं. २१२ / २६ कलम ११८ (१),, ११५ (२), ३५२, ३५१ (२) (३), ३ (५) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

## चिमटा दयाचा



सरकारने अगोदर इंटरनेट सेवा फास्ट करावी नंतरच ऑनलाईन सुविधा द्यावी! नेट-स्लो आहे म्हणून जो मानसिक त्रास होत आहे याला जबाबदार शासन व प्रशासन अन्य कोण आहे!!

## विकसित भारतासाठी कौशल्यसंपन्न मानव संसाधनाची निर्मिती हीच काळाची गरज - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** विकसित भारत २०४७चे स्वप्न साकार करण्यासाठी कौशल्यसंपन्न आणि तंत्रज्ञानसज्ज मानव संसाधनाची निर्मिती करणे अत्यावश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग यासारख्या नवतंत्रज्ञानामुळे रोजगार क्षेत्राचे स्वरूप झपाट्याने बदलत असून, या बदलांना सामोरे जाण्यासाठी युवकांना आधुनिक कौशल्ये देणे ही काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हॉटेल ताज प्रेसिडेंट येथे आयोजित वाय४डी (युथ फॉर डेव्हलपमेंट) 'इंडिया २०४७ - पॉवर ऑफ स्किल अँड एज्युकेशन' कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, युथ फॉर डेव्हलपमेंटचे अध्यक्ष प्रफुल निकम यांच्यासह विविध उद्योग समूहांचे प्रमुख उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल. देशातील २५ कोटी नागरिक अतिदारिद्र्यातून बाहेर आले असून पायाभूत सुविधा, निवास, स्वच्छता आणि उपजीविकेच्या संधींमुळे सर्वसमावेशक विकासाला गती मिळाली आहे. महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याच्या उद्दिष्टासाठी कौशल्य विकासाला विशेष महत्त्व असल्याचे सांगून त्यांनी युवकांच्या लोकसंख्यात्मक लाभाचे रूपांतर आर्थिक शक्तीत करण्यासाठी गुणवत्तापूर्ण कौशल्य प्रशिक्षण आवश्यक असल्याचे नमूद केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात राज्य शासनाने 'महाविस्तार' हे प विकसित केले असून त्याद्वारे लाखो शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, हवामान, कीडनियंत्रण आणि सिंचनासंबंधी माहिती उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. हे प विविध भाषांमध्ये कार्यरत असून तंत्रज्ञानाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पुढील हजार दिवसांत सुमारे ७० टक्के रोजगारांचे स्वरूप बदलणार असून या बदलत्या व्यवस्थेत युवकांना सुसंगत कौशल्ये आणि ज्ञान देण्यासाठी शासन, उद्योग क्षेत्र आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांच्या माध्यमातून जलसुरक्षा, आरोग्य, कौशल्य विकास आदी क्षेत्रांत प्रभावी काम होत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही कामे तळागाळापर्यंत पोहोचविण्यात वाय४डी ने प्रभावी दुवा म्हणून भूमिका बजावली आहे. गेल्या ११ वर्षांत सामाजिक परिणामकारकतेवर आधारित विश्वासार्ह कार्य उभे केले आहे. सामंजस्य करारांपेक्षा प्रत्यक्ष कामाचा समाजावर झालेला परिणाम मोजून 'इम्पॅक्ट रिपोर्ट' सादर करण्याची संकल्पना अभिनव असून, अन्य सीएसआर भागीदार संस्थांनीही या पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

यावेळी विविध उद्योग समूहांच्या सामंजस्य करारांच्या कार्यामुळे झालेल्या परिणाम अहवालांचे प्रकाशन करण्यात आले. समाजपरिवर्तनाच्या कार्यात योगदान देणाऱ्या सर्व उद्योग समूहांचे तसेच वाय४डी संस्थेचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान सुधारा

राज्यातील शेती हा व्यवसाय निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्ग साथ देत नाही. त्यामुळे शेती हा धंदा आडचणीत आला आहे. एकीकडे शेती हा व्यवसाय म्हणून पाहिला जात नाही. पुर्वी शेतीत विविध उत्पादने घेतले जात होते. आलिकडे ऊस व सोयाबिन हे प्रमुख पीक घेतले जाते. ऊसामुळे शेतीमधील जमीनीचा कस कमी होतो तर सोयाबिन सर्वजन घेत असल्याने उत्पादन अधिक होतो. याचा परिणाम आवक वाढल्याने दर कोसळले जातात. जेवढे कष्ठ शेतीमध्ये घेतले जात आहेत तेवढी कमाई होत नाही. या बाबत चिंतन होणे अपेक्षित आहे. एक तर धंदा-व्यावसाय म्हणून पहावे असे सांगितले जाते तर दुसरे कडे सर्वात तोटा-घाट्यात हा व्यावसाय आहे हे कोठेतरी मान्यच केले पाहिजे. शेती या व्यावसायाला मदत केली जाते. कर्ज दिले जाते. त्याची परत फेड होत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होताना दिसून येत आहे. कर्जबाजारी का होतात किंवा सतत कर्जमाफी का द्यावी लागते. यामागील कारणे कोणती आहेत या बाबत चिंतन होत नाही. कर्जमाफी सतत केली जाते. ती केल्याशिवाय दुसरा पर्याय दिसून येत नाही. मुळात भारतीयांचा मुख्य व्यावसाय असल्याने भारताला कृषी प्रधान देश म्हटले जाते. अशा कृषी प्रधान देशात कृषीची हालत बेकार दिसून येत आहे. मुळात सरकार सुद्धा जसे उद्योगपती, कारखानदारास सहकार्याची भुमीका निभावते तसे शेतकऱ्याबाबत दिसून येत नाही. शेती आलिकडे घाट्यात का जात आहे किंवा शेतकरी कर्जबाजारी का होतात यावर सखोल चिंतन होवून मार्ग शोधला पाहिजे. नुसत्या घोषणा होत असतील तर ते योग्य नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे उपायोजना महत्वाची आहे. ती प्रामणिक केली जात नाही. वास्तविक सतत कर्जमाफी करणे हा पक्का पर्याय नाही. त्यापेक्षा शेती कशी आर्थिकदृष्ट्या सुधारेल याचा विचार करावा. शेतकऱ्याना ट्रॅक्टरद्वारे शेतीची कामे मोफत करून द्यावीत. शेततळी हा सर्वात चांगला एक पर्याय आहे. शेतीत पाणी मुरावयाचे झाले तर शेततळे आवश्यक आहेत. त्याच प्रमाणे जोडधंदा केवळ जनावरे पाळणे असावा. यात गाय, बैल व म्हैस एवढेच असावे. मत्स्य, कोंबडी, बकरी, सुवर आदि पालन करू नये. त्याला जोडधंदा म्हणून मान्यता देवू नये. कोंबडी असो किंवा मासे हा व्यवयाय आता पर्यंत यशस्वी झाला नाही झाला तर पाच टक्के असू शकतो. सर्वात योग्य लाभदायक जोड धंदा म्हणून जनावरे पालनाचा आहे. यामुळे दुध मिळतेच, त्या बरोबर दही, तुप, लोणी मिळते. सर्वात महत्वाचे शेंणखत मिळते, जे सर्वात मौल्यवान समजले जाते. यामुळे शेतीची पोतसुधारते, आरोग्याची हानी होत नाही. रासायनिक खताच्या वापराने अनेक दुर्धर रोगाला तोंड द्यावे लागते. असो शेतकऱ्याचे जो पर्यंत आर्थिक जीवनमान सुधारणारण्यासाठी एक ठोस कार्यक्रम राबविणार नाही तो पर्यंत कर्ज देणे व माफी देणे चालूच ठेवावे लागेल. शेती घाट्यात म्हणजे तोट्यात जाते मग यावर मनन, चिंतन का होत नाही. मार्ग शोधला पाहिजे. सत्तर वर्षात शेती व शेतकऱ्याबाबत पक्के धोरण नाही. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्याच बरोबर इतरासारखे सरकारला वेठीस धरत नाही. मोर्चा किंवा तिव्र आंदोलन करीत नाही. शेतीत पिकले नाही तरी ओरड नाही. अधिक पावुस झाला, कमी झाला त्यामुळे नुकसान झाले तरी गप्प राहातो. अशा प्रामाणिक शेतकऱ्याचे अजून तरी आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी ठोस उपायोजना शोधले जात नाहीत. तेवढ्यापुरता विचार विनियम केला जातो. वास्तविक देशातील राज्यकर्त्यांनी पहिल्यांदा प्राधान्य शेती व शेतकऱ्यास दिले पाहिजे. पहिला घास हा शेतकऱ्यासाठी काढून ठेवला पाहिजे. केवळ माजी पंतप्रधान दिवंगत लालबहादुर शास्त्री यांचे लक्ष शेतकऱ्याकडे होते. त्यांच्याशिवाय दुसरा देता झालाच नाही. जगाला अन्नधान्य पुरविण्याची क्षमता भारतीय शेतकऱ्यात आहे हे लक्षात घ्यावे. हवामान योग्य व पुरक असूनसुद्धा शेतीउत्पादनात घट होते ही बाब विचार करायाला लावणारी आहे. पुर्वी जी वीस वर्षापुर्वी स्थिती होती ती आज नाही. एकतर वेगवान कामासाठी यंत्राचा वापर वाढला. यंत्रासोबत जनावरे लोप पावत गेली. मेहनती मनुष्यबळ राहीले नाही. शान-शौकत बरोबर ग्रामीण भागात दोन व चारचाकी गाड्या घरोघरी वाढू लागल्या. पुर्वीच्या आर्थिक जीवनात व सध्याच्या परिस्थितीत बदल झाला. ग्रामीण भागातील हॉटेल, बार व धाबे जोरदापने चालू लागले. त्यांचे आर्थिकजीवनमान सुधारले मात्र शेतकऱ्याचे नाही. ज्यांच्या जीवावर त्यांचे धंदे सुधारले तेच अर्थिकदृष्ट्या कमकुवत होवू लागले आहेत. कर्ज माफी हा काही यावर विलाज नाही. ठोस व कायमस्वरुपी योजनाची गरज आहे. देशात व राज्यात अनेक शेतकरी तज्ज्ञ आहेत. अभ्यासू मंडळी आहे. त्यांच्याकडून सुचना व उपयोजनासाठी तपशील मागविला पाहिजे. राज्यातील शेतकऱ्याचे काय केल्याने आर्थिकजीवनमान सुधारेल या बाबत ठोस कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. कोणत्या कारणामुळे घेतलेले कर्ज शेतकरी भरू शकत नाहीत. या मागील कारणे कोणती आहेत यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. उपायोजना व चिंतनावर वेळ घालविण्यापेक्षा तातडीने उपायोजना केली पाहिजे. राज्यातील शेतकरी समाधानी नाही. टमाटे बेभाव, त्यानंतर कांद्याची आज तीच स्थिती आहे. सोयाबिनला दर नाही. ऊस उत्पादकास तातडीने पैसे मिळत नाहीत. योग्य भाव मिळत नाही. बोटावर मोजण्याइतके शेतकरी योग्य नियोजनामुळे सुखी व समाधानी आहेत. आज निराशेच्या आवस्थेमुळे काहीजन जीवन संपवित आहेत. काहींनी अयोग्य मार्ग आवलंबला आहे ही वस्तूस्थिती आहे. आलिकडे शेतकऱ्याना कर्ज माफी दिली जाते. अनेकदा माफी दिली जाते. नंतरही परिस्थिती सुधारली का? या बाबत चिंतन होत नाही. वास्तविक एकदा का अनेकदा कर्जमाफी दिल्यास आर्थिक जीवनमान सुधारले पाहिजे. तसे होताना दिसून येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यासाठी पक्के धोरण निवडावे लागेल. शेतकरी जगला तर राज्य जगेल. राज्यात सुख, समाधान व आनंद लाभेल हे सतत लक्षात ठेवले पाहिजे.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !




**पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.**

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते. त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे. राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे. राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे. पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल ' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**-प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय कार्यालय,कोल्हापूर**

# घ्या डोळ्याची काळजी...

डोळ्यांत सतत वेदना होणे, धूसर दिसणे किंवा अचानक दृष्टी कमी झाल्यास अनेकजण त्याकडे साध्या थकव्याचे किंवा नंबर वाढल्याचे लक्षण म्हणून पाहतात. मात्र तज्ज्ञांच्या मते, काही वेळा ही लक्षणे डोळ्यांच्या कर्करोगाची म्हणजेच एूश उरपलशी ची सुरुवात असू शकते. हा आजार तुलनेने दुर्मिळ असला तरी वेळेत निदान न झाल्यास दृष्टी आणि जीव दोघांनाही धोका निर्माण होऊ शकतो.

डोळ्यांबाबत माहिती देणाऱ्या Centre for Sight या संस्थेनुसार, डोळ्यांतील पेशी अनियंत्रितपणे वाढू लागल्यास एूश उरपलशी होऊ शकतो. हा कर्करोग रेटिना, आयरिस किंवा यूव्हिया अशा डोळ्यांच्या विविध भागांमध्ये विकसित होऊ शकतो. सुरुवातीच्या टप्प्यात आजार ओळखल्यास उपचार अधिक प्रभावी ठरतात आणि दृष्टी वाचवण्याची शक्यता वाढते.

प्रौढांमध्ये आढळणारा सर्वाधिक सामान्य एूश उरपलशी

प्रौढांमध्ये सर्वाधिक आढळणारा एूश उरपलशी म्हणजे खर्पीीरेर्ली्श्ररी चशश्ररपोर. या आजारात धूसर दिसणे, पुतळीवर काळे डाग दिसणे, पुतळीच्या आकारात बदल होणे किंवा दृष्टीक्षेत्र कमी होणे अशी लक्षणे दिसू शकतात.

हा डोळ्यांचा कर्करोग मुख्यतः लहान मुलांमध्ये आढळतो. मुलांच्या डोळ्यात पांढरा प्रतिबिंब दिसणे, डोळे तिरळे होणे किंवा दृष्टी कमी होणे ही त्याची महत्त्वाची लक्षणे असू शकतात. वेळेत उपचार झाल्यास मुलांची दृष्टी आणि आरोग्य दोन्ही सुरक्षित ठेवता येऊ शकते.

तज्ज्ञांच्या मते खालील लक्षणांकडे कधीही दुर्लक्ष करू नये:

सतत धूसर दिसणे
सरळ रेषा वाकड्या दिसणे
पुतळीचा आकार किंवा रंग बदलणे
दृष्टीक्षेत्र कमी होणे
डोळ्याभोवती सूज किंवा गाठ येणे
सतत लालसरपणा
एका डोळ्यात अचानक दृष्टी कमी होणे


डोळ्यांत वेदना नेहमीच असतात का?

एूश उरपलशी च्या सुरुवातीच्या टप्प्यात अनेकदा वेदना जाणवत नाहीत. त्यामुळे लक्षणे सौम्य वाटल्याने अनेकजण तपासणी उशिरा करतात. म्हणूनच नियमित नेत्रतपासणी हा या आजाराचे लवकर निदान करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो.

कोणत्या कारणांमुळे वाढतो धोका?

संशोधनानुसार खालील घटक एूश उरपलशी चा धोका वाढवू शकतात:

## फक्त ५ गोष्टींमध्ये तयार करा घरगुती व्हिटॅमिन C सिरम; चेहऱ्यावर येईल नैसर्गिक ग्लो



सुंदर, चमकदार आणि निरोगी त्वचा मिळवण्यासाठी आजकाल अनेकजण व्हिटॅमिन सी सिरमचा वापर करत आहेत. त्वचेची काळजी घेण्यासाठी हे सिरम खूप लोकप्रिय झाले आहे. चेहऱ्यावरील डलनेस, पिग्मेंटेशन, टॅनिंग आणि काळे डाग कमी करण्यासाठी व्हिटॅमिन सी फायदेशीर मानले जाते. मात्र, बाजारात मिळणारे अनेक सिरम महाग असतात आणि त्यामध्ये केमिकल्सचाही वापर असू शकतो. त्यामुळे आता घरच्या घरी नैसर्गिक पद्धतीने व्हिटॅमिन सी सिरम तयार करण्याचा पर्याय अनेकजण निवडत आहेत.

हे घरगुती सिरम तयार करण्यासाठी फक्त पाच गोष्टींची गरज असते आणि तेही अगदी कमी खर्चात तयार होते. योग्य पद्धतीने वापरल्यास त्वचेला नैसर्गिक चमक मिळण्यास मदत होऊ शकते.

- ॲलोवेरा जेल
- व्हिटॅमिन ए कॅप्सूल
- ग्लिसरीन
- व्हिटॅमिन सी कॅप्सूल किंवा गोळ्या
- गुलाब पाणी

**सिरम बनवण्याची पद्धत:**
सर्वप्रथम एका स्वच्छ वाटीत गुलाब पाणी आणि ॲलोवेरा जेल घ्या. हे मिश्रण चांगले फेटून एकसारखे करा. त्यात गाठी राहणार नाहीत याची काळजी घ्या. त्यानंतर व्हिटॅमिन सी गोळ्या बारीक करून त्याची पावडर तयार करा आणि ती या मिश्रणात मिसळा.

यानंतर व्हिटॅमिन ए कॅप्सूल कापून त्यातील जेल मिश्रणात घाला. त्यात थोडे ग्लिसरीन टाकून सर्व साहित्य व्यवस्थित मिसळा. मिश्रण पूर्णपणे एकजीव झाल्यानंतर ते एका स्वच्छ बाटलीत किंवा कंटेनरमध्ये भरून ठेवा. हे सिरम ५ ते ६ तास फ्रिजमध्ये ठेवल्यानंतर वापरण्यास तयार होते.

**सिरम वापरण्याची योग्य पद्धत:**
रात्री झोपण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर २ ते ३ थेंब सिरम चेहरा आणि मानेवर हलक्या हाताने लावा. काही मिनिटे हलक्या हाताने मसाज करा आणि ते रात्रभर तसेच राहू द्या. सकाळी उठल्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा.

**व्हिटॅमिन सी सिरमचे फायदे:**
व्हिटॅमिन सी त्वचेमध्ये कोलेजन तयार करण्यास मदत करते. वाढत्या वयानुसार त्वचेतील कोलेजन कमी होत जाते, त्यामुळे त्वचा सैल पडू लागते आणि सुरकुत्या दिसू लागतात. अशावेळी व्हिटॅमिन सी सिरम त्वचेला घट्टपणा देण्यास मदत करू शकते.

हे सिरम त्वचेवरील डाग, पिग्मेंटेशन आणि अनइव्हन स्किन टोन कमी करण्यासाठीही उपयुक्त मानले जाते. तसेच डोळ्यांखालील काळी वर्तुळे कमी करण्यासही मदत होऊ शकते. नियमित वापरामुळे त्वचेला नैसर्गिक चमक आणि तजेला मिळू शकतो.

तथापि, कोणतेही नवीन उत्पादन वापरण्यापूर्वी त्वचेवर पॅच टेस्ट करणे आवश्यक आहे. त्वचा संवेदनशील असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणेही महत्त्वाचे ठरते.

## ॲसिडिटी मुळे वाढते का केस गळती?

आजकाल केस गळण्याची समस्या खूपच सामान्य झाली आहे. प्रदूषण, ताणतणाव, अपुरी झोप, चुकीचा आहार आणि बदलती जीवनशैली यामुळे अनेकांना कमी वयातच केस गळतीचा सामना करावा लागत आहे. मात्र, केस गळण्यामागे ॲसिडिटी किंवा पचनाच्या समस्या देखील कारणीभूत ठरू शकतात का? याबाबत तज्ज्ञांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

तज्ज्ञांच्या मते, ॲसिडिटी थेट केस गळण्याचे कारण नसते. मात्र, वारंवार ॲसिडिटी होणे किंवा पचनक्रिया बिघडणे यामुळे शरीराला आवश्यक पोषक घटक योग्य प्रमाणात मिळत नाहीत. याचा परिणाम केसांच्या आरोग्यावर होऊ शकतो.

पचनसंस्था व्यवस्थित काम करत नसेल तर शरीराला आयर्न, प्रोटीन, झिंक, व्हिटॅमिन बी१२ यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक पुरेशा प्रमाणात शोषून घेता येत नाहीत. हे घटक केसांच्या वाढीसाठी आणि मजबुतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. त्यामुळे त्यांची कमतरता निर्माण झाल्यास केस कमकुवत होऊन गळू लागतात.

ॲसिडिटीमुळे शरीरात तणावाचे प्रमाणही वाढू शकते. त्यामुळे कोर्टिसोल या तणावाशी संबंधित हार्मोनची पातळी वाढते. याचा परिणाम केसांच्या नैसर्गिक वाढीच्या चक्रावर होऊन केस पातळ होणे किंवा गळणे सुरू होऊ शकते.

तसेच, ॲसिड रिफ्लक्समुळे शरीरात सूज किंवा दाह निर्माण होऊ शकतो. ही सूज टाळूच्या आरोग्यावर परिणाम करून केसांच्या मुळांना कमकुवत करू शकते. त्यामुळे केस तुटणे आणि गळणे वाढू शकते.

ॲसिडिटीवर घेतल्या जाणाऱ्या काही औषधांचाही केसांवर परिणाम होऊ शकतो. अँटासिड किंवा इतर औषधे दीर्घकाळ घेतल्यास शरीरातील काही पोषक घटकांचे संतुलन बिघडू शकते, ज्यामुळे केसांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते.

केस गळती टाळण्यासाठी संतुलित आहार घेणे खूप महत्त्वाचे आहे. प्रोटीन, आयर्न, बायोटिन आणि विविध जीवनसत्त्वांनी भरपूर अन्न खावे. भरपूर पाणी प्यावे, पुरेशी झोप घ्यावी आणि ताणतणाव कमी ठेवण्याचा प्रयत्न करावा. तसेच केसांना खूप घट्ट बांधणे टाळावे.

घरगुती उपायांमध्ये कोरफडीचा रस, आल्याचा चहा आणि सफरचंद व्हिनेगर यांचा काही प्रमाणात फायदा होऊ शकतो. हे पदार्थ पचन सुधारण्यास मदत करतात. मात्र, केस मोठ्या प्रमाणात गळत असतील तर स्वतः उपचार करण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

ॲसिडिटी आणि केस गळती यांचा थेट संबंध नसला तरी खराब पचन आणि पोषणाची कमतरता यामुळे केसांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे निरोगी पचनसंस्था आणि संतुलित आहार हेच निरोगी केसांचे खरे रहस्य आहे.

## महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये राजा नारायणलाल लाहोटी शाळेचे घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी:** राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.


इयत्ता ८ वीच्या ६३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. त्यापैकी ३९ विद्यार्थी पात्र ठरले. तसेच इयत्ता ५ वीच्या ३३ विद्यार्थ्यांपैकी १८ विद्यार्थ्यांनी यश मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

या परीक्षेत कु. हिंदवी आरण्ये हिने २६६ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच निधी कुटवाडे (२३२ गुण), अर्णव पाटील (२२६), वेदांत बंग (२१४), ईशान तापडिया (२०६), पूर्वा बजाज (२००), मधुरा झंवर (१९८) सर्वेश नाईकवाडे (१९४), केशव वायचळे (१८६), स्पर्श जैन (१८२), गौरवी आगलावे (१८०), जान्हवी मुसांडे (१७४), आशुतोष दानवे (१७२), हर्ष धाराशिवे (१७२) मिहिर घुगे (१७२), विहान पाटील (१७०) आणि विहान पल्लोड (१७०) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.
या सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विभागातील शिक्षक राजेंद्र कांबळे, दर्शन देशपांडे, अरुण भोगे, नितीन कांबळे, अवनी शेठ, अश्विनी पाटील, उल्का मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, शैलेश लाहोटी, सचिव आशिष बाजपाई, चेअरमन आनंद लाहोटी, ईश्वरप्रसाद डागा, राजेंद्रकुमार मालपाणी, हुकुमचंद कलंत्री, शरदकुमार नावंदर, डॉ अनिल राठी, चैतन्य भार्गव, आशिष अग्रवाल, स्नेहल उटगे, निखिल राठी, रवींद्र वोरा, आशिष सोमाणी, प्राचार्य कर्नल एस. श्रीनिवासुलू तसेच रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापनाने समाधान व्यक्त केले असून, भविष्यातही विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल करावे,अशा शुभेच्छा दिल्या.

## आयएमए बसवणार पहिली कापडी पिशवी वेंडिंग मशीन :पर्यावरण दिनापासून क्यूआर कोड स्कॅन करा, कापडी पिशवी मिळवा



**लातूर/प्रतिनिधी:** वाढत्या प्लास्टिक प्रदूषणामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांना आळा घालण्यासाठी लातुरात एक स्तुत्य उपक्रम राबवला जात आहे. क्लिन लातूर, ग्रीन लातूर' या संकल्पनेतून इंडियन मेडिकल असोसिएशन'च्या (आयएमए) लातूर शाखेने शहरात पहिलीच पर्यावरणपूरक कापडी पिशवी वेंडिंग मशीन' उपलब्ध करून दिली आहे.

शुक्रवारी, ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गंजगोलाई येथील श्री जय जगदंब मंदिर परिसरात ही मशीन कार्यान्वित होणार आहे. लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना यांच्या हस्ते सकाळी १० वाजता याचे उद्घाटन होईल. या मशीनमध्ये एकाच वेळी ३०० कापडी पिशव्या उपलब्ध असतील. नागरिकांनी मोबाईलवरील युपीआय पद्वारे क्यूआर कोड स्कॅन करून १० रुपये भरल्यास, त्यांना दर्जे दार कापडी पिशवी मिळणार आहे. प्लास्टिकला पर्याय म्हणून या टिकाऊ पिशवीचा वापर वाढल्यास कचरा आणि प्रदूषणाला आळा बसेल.६० हजार रुपये किंमतीच्या या मशीनला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास आणि मनपाने जागा दिल्यास, शहरात आणखी काही ठिकाणी हा उपक्रम राबवण्याची ग्वाही 'आयएमए'ने दिली आहे. मनपाने ही संकल्पना राबवल्यास प्लास्टिक वापरावर मोठे नियंत्रण मिळवणे शक्य होईल. एआय इमेज

प्लास्टिकचा भस्मासूर रोखण्यासाठी आणलेली ही मशीन अत्यंत आधुनिक आहे. नागरिकांना यातून पिशवी मिळवण्यासाठी केवळ १० रुपये मोजावे लागतील. मोबाईल मधील कोणत्याही युपीआय पच्या मदतीने मशीनवरील क्यूआर कोड स्कॅन केल्यावर अवघ्या काही सेकंदात उत्तम दर्जाची कापडी पिशवी हातात पडेल. खरेदीला जाताना पिशवी न्यायला विसरल्यास ही मशीन नागरिकांसाठी अत्यंत सोयीची ठरणार आहे.

# निर्भय,नि:पक्षपणे व मुक्त वातावरणात निवडणूक होईल याची दक्षता घ्या

## निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांचे निर्देश



**धाराशिव/प्रतिनिधी:** उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक विधान परिषद निवडणूक २०२६ साठी येत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे.निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करून ही निवडणूक निर्भय,नि:पक्षपणे आणि मुक्त वातावरणात पार पडेल याची दक्षता घ्यावी,असे निर्देश निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज बुधवारी (दि.३) विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा म्हाडदळकर,पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे,निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव,उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, संतोष राऊत,श्रीमती. स्वाती शेंडे,श्रीमती. अरुणा गायकवाड,धाराशिव उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव,पोलीस निरीक्षक अमोघ भुजबळ उपस्थित होते.तसेच ऑनलाइन पद्धतीने बीडच्या प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके,लातूरचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी केशव नेटके,बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे सहभागी होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना श्री.बोरकर म्हणाले की,राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी या निवडणुकीत सूक्ष्म निरीक्षक म्हणून काम पाहणार आहेत.त्यामुळे तीनही जिल्ह्यांतील सूक्ष्म निरीक्षकांच्या याद्या मागवून घ्याव्यात.मतदान साहित्य वितरण व स्वीकृती केंद्राचे काम योग्य प्रकारे पार पाडावे.मतपेट्या सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहोचविणे तसेच मतदानानंतर सीलबंद मतपेट्यांची वाहतूक कडक सुरक्षा व्यवस्थेत करावी.या प्रक्रियेत कोणतीही उणीव राहणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी.असे ते म्हणाले.

मतदान केंद्रावरून मतदान प्रक्रियेची वेळोवेळी माहिती संकलित करण्यात यावी असे सांगून श्री.बोरकर म्हणाले की, मतदान प्रक्रियेचे वेबकास्टिंग करण्यात यावे.मतदान केंद्र तहसील कार्यालयात असल्याने दिव्यांग मतदारांच्या सोयीसाठी रॅम्प व व्हीलचेअरची व्यवस्था उपलब्ध असावी,असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. आचारसंहितेच्या अंमलबजावणीत दक्ष राहून काम करावे.प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपाती राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे,असेही श्री.बोरकर यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले की,सर्व मतदान पथकांना तीनही टप्प्यांतील प्रशिक्षण व्यवस्थित व परिपूर्ण पद्धतीने देण्यात यावे.तसेच आचारसंहिता भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांनी निवडणुकीची माहिती देताना सांगितले की,या निवडणुकीत उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे ६३ व लातूर जिल्हा परिषदेचे ६९ असे एकूण १३२ मतदार आहेत.लातूर महानगरपालिकेचे ७७ मतदार,बीड जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे ३०४,लातूर जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे २२१ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतींचे २५४ असे एकूण ७७९ मतदार आहेत. जिल्हा परिषद,महानगरपालिका आणि नगरपालिका/नगरपंचायतींचे मिळून एकूण ९८८ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहेत.बीड जिल्हा परिषदेची निवडणूक झालेली नसल्यामुळे त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य मतदार म्हणून नसल्याची माहितीही त्यांनी दिली.

या बैठकीला लातूर आणि बीड जिल्ह्यांतील निवडणुकीशी संबंधित विविध विभागांचे अधिकारी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

# टिकेकरवाडी यार्डमधील सुधारणा कामामुळे सोलापूर विभागातील रेल्वे गाड्यांवर परिणाम

**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागामार्फत टिकेकरवाडी यार्ड येथे इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी प्री नॉन-इंटरलॉकिंग व नॉन-इंटरलॉकिंगची कामे हाती घेण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर ५ जून ते १० जून २०२६ या कालावधीत वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार असून, सोलापूर विभागातून धावणाऱ्या काही रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होणार आहे.
गाड्यांचे नियमन (विलंबाने धावणार):

गाडी क्रमांक ११३११ सोलापूर-हसन एक्स्प्रेस (प्रवास प्रारंभ दिनांक ०५ जून २०२६) ४५ मिनिटे उशिराने धावेल. गाडी क्रमांक १७३०८ बागलकोट-म्हैसूर बसवा एक्स्प्रेस (०५ जून) ४५ मिनिटे उशिराने धावेल.



गाडी क्रमांक १८५२० लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई-विशाखापट्टणम एक्स्प्रेस (०८ जून) २ तास विलंबाने धावेल. गाडी क्रमांक ०१४६५ सोलापूर-कलबुर्गी विशेष गाडी (०८ जून) १ तास ३० मिनिटे विलंबाने धावेल. गाडी क्रमांक १६५३६ पंढरपूर-म्हैसूर गोलगुंबज एक्स्प्रेस (०८ जून) ३० मिनिटे विलंबाने धावेल. गाडी क्रमांक ११३०१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-केएसआर बेंगळुरू उद्यान एक्स्प्रेस (०८ जून) ३० मिनिटे विलंबाने धावेल. गाडी क्रमांक १६३८२ कन्याकुमारी-पुणे एक्स्प्रेस (०९ जून) १ तास १५ मिनिटे विलंबाने धावेल. गाडी क्रमांक ११०२० भुवनेश्वर-सीएसएमटी मुंबई एक्स्प्रेस (०९ जून) ४० मिनिटे विलंबाने धावेल.
मार्ग बदल (डायव्हर्जन):
गाडी क्रमांक ५७६६२ विजयपूरा-रायचूर पॅसेंजर (०५ ते १० जून २०२६) विजयपूरा-होटगी-वाडी मार्गे चालविण्यात येईल. त्यामुळे होटगी-सोलापूर-होटगी या मार्गावर सेवा उपलब्ध राहणार नाही. गाडी क्रमांक ५७६६१ रायचूर-विजयपूरा पॅसेंजर (०५ ते १० जून २०२६) वाडी-होटगी-विजयपूरा मार्गे चालविण्यात येईल. त्यामुळे होटगी-सोलापूर-होटगी दरम्यान सेवा बंद राहील.
पुनर्नियोजन (रिशेड्यूल):

गाडी क्रमांक १६५३६ पंढरपूर-म्हैसूर गोलगुंबज एक्स्प्रेस (१० जून २०२६) २ तास २० मिनिटांनी, दुपारी ३:२० वाजता सुटेल. गाडी क्रमांक ११३०१ सीएसएमटी मुंबई-केएसआर बेंगळुरू उद्यान एक्स्प्रेस (१० जून २०२६) २ तास १५ मिनिटांनी, सकाळी १०:१० वाजता सुटेल.
रद्द करण्यात आलेल्या गाड्या:

गाडी क्रमांक ०१४६५ सोलापूर-कलबुर्गी विशेष गाडी (१० जून २०२६) रद्द राहील. गाडी क्रमांक ०१४६६ कलबुर्गी-सोलापूर विशेष गाडी (१० जून २०२६) रद्द राहील.

रेल्वे प्रशासनाने सांगितले की, पायाभूत सुविधा उन्नतीकरण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने हे वाहतूक ब्लॉक आवश्यक आहेत. प्रवाशांनी होणाऱ्या गैरसोयीची नोंद घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रेल्वेकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राची विक्रमी झेप; सौर कृषिपंपांमध्ये गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

## देशातील एकूण सौर पंपांमध्ये महाराष्ट्राचा ६४ टक्के वाटा

**मुंबई/प्रतिनिधी:** सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे.

प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व



व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे.

देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार, उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे. याआधी महाराष्ट्राने महावितरणच्या माध्यमातून मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत एकाच महिन्यात तब्बल ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याची विश्वविक्रमी कामगिरी केली आहे. त्याची नोंद डिसेंबर २०२५ मध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमध्ये सर्वसाधारण शेतकऱ्यांना केवळ १० टक्के आणि अनुसूचित जाती-जमाती शेतकऱ्यांसाठी केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्स्यावर तीन, पाच व ७.५ अश्वशक्तीचे सौर कृषिपंप देण्यात येत आहेत. सौरपंपाच्या पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होते. त्यामुळे आतापर्यंत १० लाखांवर शेतकऱ्यांची वीजबिलांमधून मुक्तता झाली आहे. तर दिवसा अखंडित वीजपुरवठा मिळत आहे. यासोबतच शेतातील विद्युत अपघातांचा धोकाही पूर्णतः टळला आहे. या सौर पॅनेल्समुळे सिंचनासह शेत घरातील विविध उपकरणे, मोबाईल चार्जिंग व ई-वाहन चार्जिंग करणेही सहज शक्य झाले आहे. तसेच शिल्लक विजेच्या आधारे शेतकऱ्यांना छोटे कृषिपुरक अन्य व्यवसाय सुरू करण्याची संधी मिळाली आहे.

या योजनेतील प्रत्येक सौरपंपाला ५ वर्षांची वॉरंटी देण्यात आली आहे. या कालावधीत देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादार एजन्सीवर बंधनकारक आहे. तसेच सोलर पॅनेल्स आणि पंपाचे नुकसान, नैसर्गिक आपत्ती तसेच चोरीविरोधी विमा संरक्षणही उपलब्ध आहे. सौर कृषिपंपाबाबत काही तक्रार असल्यास संबंधित शेतकऱ्यांना महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईट, २४ तास सुरु राहणारे टोल फ्री क्रमांक आणि संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करण्याची सोय उपलब्ध आहे.

# जागतिक पर्यावरण दिनी लातुरात १० हजार झाडांचा वाढदिवस

## मनपा आयुक्त मानसी मीना उपस्थित राहणार

**लातूर प्रतिनिधी:** ५ जून ते १५ जुलै २०१६ ला लातूर वृक्ष चळवळीने लातूर शहरात सुमारे १० हजार झाडे लावली. केवळ लावलीच नाही तर ती जगवली. आता ती झाडे मोठी दहा वर्षाची झाली आहेत. या झाडांचा दहावा वाढदिवस ५ जून रोजी लातूर शहरातील येथील स्टीम एजयुकेशन, पाटील प्लाझा जवळ, औसा रोड लातूर येथे सकाळी साजरा करण्यात येणार आहे. या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाला लातूर मनपाच्या आयुक्त मानसी मीना उपस्थित राहणार आहेत. शिवाय शहरात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती लातूर वृक्ष चळवळ आणि सह्याद्री देवराईचे समन्वयक, पर्यावरण प्रेमी सुपर्ण जगताप यांनी दिली आहे.

झाडांच्या वाढदिवसानिमित्त शहरातून वृक्षदिंडी काढून लहान मुलांकडून जनजागृती करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रतिनिधिक वृक्षारोपण करून काही झाडं लावली जाणार असून वृक्षारोपणाला प्रारंभ होणार आहे. त्यानंतर प्लास्टिक संकलन केले जाणार आहे. तरुण मुलं-मुली बेटावर जाऊन प्लास्टिक उचलणार आहेत.



दुर्मिळ वनस्पती व बीज संकलन करणार आहेत. सह्याद्री देवराईला भेट व वृक्षारोपण.केले जाणार आहे. मनपा आयुक्त या सर्व कार्यक्रमाना उपस्थित राहणार आहेत. लातूर वृक्ष चळवळ ,सह्याद्री देवराई , स्टीम एज्युकेशन, ऋत फाउंडेशन, स्नेहसृजन फाउंडेशन, सनराईज सामाजिक संस्था, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी या सर्व संस्था पर्यावरण उपक्रमात सहभागी होणार आहेत. लातूर वक्ष चळवळ ज्याने शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. अशी माहिती सह्याद्री देवराई व लातूर वृक्ष चळवळीचे समन्वयक सुपर्ण जगताप यांनी दिली. पर्यावरण प्रेमी नागरिकांनी ,विद्यार्थ्यांनी, महिलांनी जास्तीत जास्त संख्येत विविध उपक्रमात सहभाग घ्यावा. असे आवाहनही त्यांनी केले आहे.

लातूर वृक्ष चळवळ गेल्या १५ वर्षांपासून पर्यावरण क्षेत्रात काम करत आहे. लातूर जिल्ह्यात ६ सह्याद्री देवराया उभ्या केल्या आहेत चाकूर तालुक्यातील रामवाडी झरी,नागराळ उदगीर येथे, मांजरा देवराई,बोकनगाव लातूर तालुक्यातील देवीच्या डोंगरावरील देवराई, चिलवंतवाडी औराद शहाजनी जवळ आणि सहावी हासेगाव औसा तालुक्यातील देवराई प्रकल्प उभारले आहेत

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सेवापूर्ती गौरव सोहळ्यात मुख्याध्यापक कैलास कांबळे यांचा भावपूर्ण सत्कार

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ताडगाव ता. कळंब येथील मुख्याध्यापक मा. श्री. कैलास मारुती कांबळे यांनी शिक्षण क्षेत्रात तब्बल ३० वर्षांची उल्लेखनीय सेवा पूर्ण करून सेवानिवृत्ती स्वीकारली. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यात त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवलिंग पटवे साहेब उपस्थित होते. तसेच अखिल भारतीय शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष लालासाहेब मगर, सहसंचालक तथा विभागीय अध्यक्ष नागपूर, श्री. कल्याणराव सोनवणे निवृत्त गटशिक्षणाधिकारी, श्री. मदने साहेब यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून श्री. कांबळे यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कैलास कांबळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा विशेष उल्लेख केला. एक आदर्श शिक्षक, कर्तव्यनिष्ठ मुख्याध्यापक आणि



विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे मार्गदर्शक म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे वक्त्यांनी सांगितले. त्यांच्या सेवाकाळात शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसह सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनाही चालना मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमात सामाजिक परिवर्तन संस्था, नळदुर्गचे संस्थापक अध्यक्ष मारुती बनसोडे यांनी कैलास कांबळे यांच्याशी असलेल्या जिव्हाळ्याच्या मैत्रीबद्दल मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, मैत्री ही केवळ ओळख नसून विश्वास, आपुलकी आणि परस्पर सहकार्याची भावना आहे. कैलास कांबळे यांनी आयुष्यभर जपलेले मैत्रीचे नाते अनेकांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तब्बल ४२ वर्षांपासून जपलेली वर्गमित्रांची मैत्री. यावेळी वर्गमित्र पितांबर गवळी, मारुती बनसोडे, माजी पोलीस कर्मचारी पवार सर, माजी सैनिक कुमार मोरे, संपादक खंडेराव देडे, हरीलाल लोंढे, सहशिक्षक डावरे सर तसेच मुख्याध्यापक राम बनसोडे यांनी उपस्थित राहून आपल्या आठवणींना उजाळा दिला. शालेय जीवनातील प्रसंग, संघर्ष आणि यशस्वी वाटचालीच्या आठवणींनी वातावरण भावनिक झाले. अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून कैलास कांबळे यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा, शिस्तप्रियता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या प्रेमाचा उल्लेख केला. शिक्षक म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा दिली असून त्यांचे योगदान समाज कायम स्मरणात ठेवेल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

सेवानिवृत्तीच्या निमित्ताने बोलताना कैलास कांबळे यांनी आपल्या सहकारी शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि मित्रपरिवाराचे आभार मानले. सेवाकाळात मिळालेल्या सहकार्यामुळेच आपण यशस्वीपणे जबाबदाऱ्या पार पाडू शकलो, असे त्यांनी नमूद केले. शिक्षण क्षेत्रातील अनुभव सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण आणि संस्कार देणे हीच शिक्षकांची खरी जबाबदारी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आगलावे यांनी उत्कृष्टपणे केले. त्यांच्या प्रभावी सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. शेवटी उपस्थित मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांच्या शुभेच्छांमध्ये हा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.शिक्षण क्षेत्रात दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल मुख्याध्यापक कैलास मारुती कांबळे यांना उपस्थितांनी भावपूर्ण निरोप देत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी निरोगी, आनंदी आणि यशस्वी जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.

# लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान



**मुंबई/प्रतिनिधी:** मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महा आयकॉन २०२६' हा जीवनगौरव पुरस्कार देऊन पुढारी' माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला.

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला.

राज्याचे उद्योगमंत्री श्री. उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक श्री. प्रतापसिंह जाधव आणि संपादक श्री. योगेश जाधव मंचावर उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

# रागाने बघितल्यावरुन काठीने मारहाण

**लातूर/प्रतिनिधी:** 'तू माझ्याकडे रागाने का बघितले' म्हणत दोघांनी फिर्यादीला काठीने मारहाण केल्याची घटना येथील रेल्वे स्टेशन परिसरात बुधवारी (दि. ३) सायंकाळी घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुह्याची नोंद करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील एका पान टपरीसमोर भांडण सुरु होते. दरम्यान, फिर्यादी हणमंत राजेंद्र चामे (रा. नांदगाव ता.जि. लातूर) हे तेथून निघाले होते. भांडण करीत असलेले विक्की व्हरसे व इतर एकाने तु आमच्याकडे का बघतोस म्हणत हणमंत चामेला काठीने मारहाण केली. तर दुसऱ्याने बरगडीत चावा घेतला. पुन्हा आमच्या भांडणात पडला तर जीवे मारण्याची धमकी दिली. दोघांच्या भांडणात हणमंतला चाप बसला. यावरुन एमआयडीसी पोलीस ठाण्यात विक्की व्हरसे व अन्य एकावर कलम ११८(१), ३५२, ३५१, (२) (३), ३(५) नुसार गुन्हा दाखल आहे. अधिक तपास पोहे चामे करीत आहेत. घटनेनंतर स्टेशन परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

# १४७ पैकी ८० ग्रीन बेल्टवर अतिक्रमण :३० उद्यानांमध्ये झाडेच शिल्लक नाहीत

**लातूर/प्रतिनिधी:** शहराचे सौंदर्य आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असलेले लातूर शहरातील बहुतांश 'ग्रीन बेल्ट' (हरित पट्टे) सध्या दुरवस्थेत आहेत. अपुरे मनुष्यबळ आणि लोकसहभागाच्या अभावामुळे शहरातील एकूण १४७ पैकी ३० ग्रीन बेल्ट पूर्णपणे भकास झाले आहेत. तर तब्बल ८० ग्रीन बेल्टच्या जागेवर मंदिरे आणि समाजमंदिरे उभारण्यात आल्याने या जागा मूळ उद्देशापासून भरकटल्याचे चित्र आहे.

वेगाने विकसित होणाऱ्या लातूर शहरात नागरिकांना घरापासून जवळच निसर्गरम्य वातावरण मिळावे, यासाठी ग्रीन बेल्टची निर्मिती करण्यात आली होती. मात्र, सध्या ३० उद्यानांमध्ये झाडेच शिल्लक नाहीत. वॉकिंग ट्रॅक आणि उद्यानाच्या संरक्षक भिंती (कंपाउंड) तुटल्या आहेत, तसेच तिथे मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने नागरिकांनीही पाठ फिरवली आहे. प्रशासनाने सुरुवातीला हे पट्टे विकसित केले, मात्र त्यांचे सौंदर्य टिकवण्यात त्यांना अपयश आले आहे. सध्या केवळ ३७ ग्रीन बेल्ट सुस्थितीत आहेत.या दुरवस्थेमागे कर्मचाऱ्यांची तीव्र टंचाई हे प्रमुख कारण आहे. एका ग्रीन बेल्टच्या देखभालीसाठी किमान २ कर्मचारी याप्रमाणे पालिकेला २९० कर्मचाऱ्यांची आवश्यकता




आहे. मात्र, उद्यान विभागाकडे सद्यःस्थितीत केवळ ६ कर्मचारीच उपलब्ध आहेत. नवीन पदभरतीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. मनुष्यबळाअभावी हिरवळ संपत चालली आहे. एआय इमेज .ग्रीन बेल्टमधील झाडे नष्ट झाली .नागरिकांसाठी असलेले वॉकिंग ट्रॅक पूर्णपणे तुटलेले आहेत. कंपाउंड वॉल ढासळलेली आहे. उद्यानांमध्ये नागरिकांऐवजी मोकाट जनावरांचा मुक्त वावर वाढला आहे.उद्यान विभागासाठी आवश्यक कर्मचारी पदभरतीसाठी प्रस्ताव पाठवलेला आहे परंतु, त्याला अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

> सद्यःस्थितीत शहरातील ग्रीन बेल्टमध्ये वृक्षारोपन करण्याचे नियोजन आहे. यासाठी एन-कॅब अंतर्गत निधी उपलब्ध आहेत. परंतु, सदरील निधी हा केवळ वृक्षारोपणासाठी वापरात येणार आहे.
> - देविदास जाधव, अतिरिक्त आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका.

लातूरमध्ये एकूण १४७ ग्रीन बेल्ट आहेत. धक्कादायक बाब म्हणजे यातील तब्बल ८० ग्रीन बेल्टचा वापर विविध मंदिरे, समाजमंदिरे आणि सभागृहांसाठी केला जात आहे. याचाच अर्थ निम्म्याहून अधिक जागांवर सिमेंटचे जंगल उभे राहिले आहे. केवळ ३७ ग्रीन बेल्ट सध्या सुस्थितीत असून, उर्वरित जागांची मोठी दुरवस्था झाली आहे.

शहराचा विकास करताना पर्यावरण संवर्धनासाठी राखीव ठेवलेल्या जागेला 'ग्रीन बेल्ट' म्हणतात. इथे फळझाडे, फुले, आयुर्वेदिक वनस्पती आणि मुलांसाठी खेळणी असतात. हे पट्टे केवळ करमणुकीसाठी नसून वाढते प्रदूषण रोखण्यासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहराची 'फुप्फुसे' म्हणून अत्यंत मोलाची भूमिका बजावतात.

# सोयाबीन सात हजारांवर स्थिरावले

**लातूर/प्रतिनिधी:** खरीप हंगामाची लगबग सुरु असताना दुसरीकडे बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवकही घटली आहे. गेल्या काही दिवसांमध्ये सोयाबीन दरात चढ-उतार होते. ८ हजार रुपये प्रतिक्विंटलपर्यंत दर गेले होते. सोयाबीन आता ७ हजार रुपये प्रतिक्विंटलवर स्थिरावले असल्याचे चित्र आहे.



गेल्या दोन वर्षांपासून सोयाबीनच्या दरात कमालीची घट झाली होती. याचा परिणाम थेट क्षेत्रावरही झाला होता. पडत्या दरात शेतकऱ्यांना आधार मिळाला तो हमीभाव केंद्राचा. ५ हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल दराने शेतकऱ्यांना सोयाबीन विक्री करता आले. शेतकऱ्यांनी साठवणूक केलेले सोयाबीन संपल्यानंतर दरात मोठी वाढ झाली होती. गतमहिन्यात सोयाबीनला ८ हजार रुपयांपर्यंत दर मिळाला होता. वाढत्या दराचा शेतकऱ्यांना नव्हे तर व्यापारी, आडत्यांनाच अधिक लाभ झाला, आता येथील उच्चत्तम्म कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवक ५. हजार क्विंटल असून दर सरासरी ७ हजार रुपये आहे. खरिपाची लगबग सुरु असताना वाढलेले दर हे समाधानकारक असले तरी भविष्यांतही दर कायम रहावेत अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी:** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ४ जून, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १८ जून, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# केवायसी ..

कशी करु केवायसी
धड धड करते छाती
उकलता व्रात्य सत्य
भलतेचं लागेल हाती

कसला तुमचा संबंध
गुप चुप ठेवली नाती
काही कामे करायची
बा काळ्याभोर राती

हातात द्यावा न पैसा
कुटाणी करावे किती
बँकेत कायमची गर्दी
कट कटी घाले भिती

जमानाही होत काही
ओसाड पडली खाती
कागद पत्रे रद्दीत गेले
फुकटचे डोस्के खाती

चार चाकी गाडी दारी
उगाचं आणाल जप्ती
सुख आमचे पाहवेना
का नजरतुझी खुपती

असो नोकरीसरकारी
जुनीचं आहे गं भरती
बाकीसारे लुटू लागले
का लक्ष आम्हां वरती

लाडकी लाडकी बोले
मतांची आणलीभरती
नकोच आम्हां योजना
वसुली करणारं पुरती

**-हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# गावोगावी बैठक घेऊन खरीप हंगामाबाबत मार्गदर्शन करणार:

# हणमंतवाडी येथे खरीप हंगाम पूर्वतयारी कार्यशाळा

**रेणापूर/प्रतिनिधी:**
येत्या खरीप हंगामात एल निनोचा प्रभाव असण्याचा अंदाज हवामान विभागामार्फत वर्तविण्यात आलेला असून शेतकऱ्यांमार्फत खरीप हंगाम पूर्व कामे जोमात सुरू आहेत.या साठी कृषी विभागाच्या वतीनरेणापूर तालुक्यातील हणमंतवाडी येथे खरीप हंगाम पुर्व तयारी कार्यशाळा घेण्यात आली. तसेच खरीप पेरणी संदर्भात सविस्तर माहीती देण्यासाठी गावोगाव बैठकांचे आयोजन करण्यात आल्याची माहीती तालूका कृषि अधिकारी नितीन कांबळे यांनी दिली.



तालुक्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या खरीप हंगामाचे शास्त्रोक्त पद्धतीने नियोजन व अंमलबजावणी करण्याकरिता तालुक्यातील कृषि विभागाचे मंडळ कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी व सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मार्फत गावोगावी गाव बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे.सदर बैठकीमध्ये माती परीक्षण पासून बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता चाचणी ,बीबीएफ लागवड तंत्रज्ञान इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

त्याच अनुषंगाने गुरुवारी हणमंत वाडी येथे गाव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये लातूर कृषि विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक श्री महेशकुमार तीर्थकर यांनी एल निनो संभाव्य परिणाम व उपयोजना,शिवारात पेरणी होणारे मुख्य पीक सोयाबीन उत्पादन वाढीची पंच सूत्रे या बाबत माहिती दिली. तसेच बियाणे निवड, उगवण क्षमता, बीज प्रक्रिया, पेरणी पद्धत( बीबीएफ व टोकण), एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन,कीड व रोग नियंत्रन याबाबत माहिती देण्यात आली. तसेच माती परीक्षण,बीबीफ पेरणी, व टोकण पद्धत या पेरणी पद्धती कडे शेतकऱ्यांनी कल वाढवावा ज्या मुळे आपल्याला उत्पादन खर्च कमी करून उत्पन्नवाढीसाठी एक वरदान ठरेल असे सांगून प्रत्येकाने आपल्या एकूण पेरणी क्षेत्रपैकी किमान ३०% क्षेत्रावर या पद्धतीने पेरणी करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यासोबतच डाळवर्गीय पिके व तृणधान्ये पिकाच्या पेरणी क्षेत्रात वाढ करण्याचे आवाहन करण्यात आले.त्याबरोबरच कृषि विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना व अर्ज करण्याची पद्धत,निविष्ठा खरेदी करताना घ्यावयाची काळजी इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी तालुका कृषि अधिकारी श्री एन.पी. कांबळे, उप कृषी अधिकारी श्री एस. जी. वाघमारे, सहाय्यक कृषि अधिकारी श्री अमोल नागरगोजे,श्री.शिवाजी कदम, श्री रणजीत चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.


# टी. सी. हरवली आहे.

**सुखदेव नारायण गोबाडे या नावाची जिल्हा परिषद प्रा. शाळा अंबुलगा (बू) ता.निलंगा ची १० पास ची टी.सी. अंबुलगा (बू) ते निलंगा बस प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्यास संपर्क करावे योग्य बक्षीस देण्यात येईल.**

**- संपर्क :सुखदेव नारायण गोबाडे**
**मोबाईल - ९७०२०३२३३६**

# CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM KHAJABABA HAIDARSAB SHAIKH TO KHAJABABA HAIDERSAB MOMIN HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE KHAJABABA HAIDERSAB MOMIN IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLD NAME: KHAJABABA HAIDARSAB SHAIKH
NEW NAME: KHAJABABA HAIDERSAB MOMIN
ADDRESS: C/O MU POST NITUR,NITUR,PO NITOOR,TQ NILANGA,DIST-LATUR (M.S.)413521


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६